असा. क्र. ५१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊर्थ/२०/९९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, जुलै ७, १९९९/आषाढ १६, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 7th July 1999

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. EXM. 1285/2775/CR. 339/(Part II)/E-7.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments issued in this behalf and in force in the State or any part thereof, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following Revenue Qualifying Examination for promotion to the post of Awal Karkun from the cadre of Clerk Typist rules under the Revenue and Forests Department of the Government of Maharashtra, namely :—

1. *Short title.*—These rules may be called the Maharashtra Revenue Qualifying Examination for promotion to the post of Awal Karkun from the cadre of Clerk Typist Rules, 1999.

2. *Definitions.*—In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Appendix" means Appendix to these rules ;

(*b*) "Appointed date" means date of coming into force of these rule

(*c*) "Awal Karkun" means an Awal Karkun and includes Treasu Awal Karkun, Deputy Chitnis and Shirastedar, as specified under the Maharashtra Revenue Department Awal Karkun (Recruitment) Ru e 1996;

(*d*) "Clerk Typist" includes Junior Clerk, Election Inspector an Junior Auditor in a Revenue Office in any division;

(*e*) "Departmental Examination" means the Sub-Servic Departmental Examination or Revenue Clerks Departmenta Examination and includes any other Examination Declared by th Government for confirmation in service for clerks and posts include in the cadre of clerk;

(*f*) "division" means the Revenue division constituted under sectio 3 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah.XLI of 1966).

(*g*) "Examination" means Revenue Qualifying Examination fo promotion to the post of Awal Karkun from the cadre of Clerk Typist under the Revenue and Forests Department of the Government o Maharashtra;

(*h*) " Secondary School Certificate Examination" means the final examination conducted at the end of secondary stage of education by a Divisional Board under the Maharashtra Secondary and High Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965) at the end of the Secondary stage of education as defined in that Act and includes any other Examination declared by Government to be equivalent thereto.

3. *Necessity of Passing Examination.*—Every Clerk Typist whether appointed by promotion or by nomination, before or after the appointed date unless exempted from passing the Examination under rule 5, shall be required to pass the Examination for being eligible for promotion, as Awal Karkun, in accordance with the provisions of these rules.

4. *Eligibility to appear for Examination.*—Every Clerk Typist who has,—

(*a*) completed not less than three years continuous service in his post ; and

(*b*) passed the Sub-Service Departmental Examination or Revenue Clerk Departmental Examination, as the case may be shall be eligible to appear for the Examination.

5. *Exemption from Passing Examination.*—The following persons shall be exempted from passing the Examination—

(*a*) a person who has already been confirmed in the post of Awal Karkun, proper or other posts included in the cadre of Awal Karkun, before the appointed date;

(*b*) a person who has already passed the Revenue Qualifying Examination before the appointed date;

(*c*) a person who has attained the age of forty-five years on or after the 1st day of November 1977:

Provided that, once the seniority lost by him in accordance with the provisins of rule 7, shall not be restored on account of such exemption.

6. *Period and number of chances for passing Examination.*—A Clerk Typist shall be required to pass the Examination within three chances and within nine years of his continuous service.

7. *Effect of passing Examination on seniority.*—A Clerk Typist who has passed the Examination in accordance with the provision of rule 6, shall retain his original seniority. If he fails to pass the Examination within three chances and nine years, then he will lose his seniority to all those Clerk Typists who have passed or are exempted from passing of the Examination, before him, as well as to those Clerk Typists who are senior to him and who may pass the Examination after him; but within prescribed period and chances specified in these rules.

8. *Chances for appearing Examination.*—Subject to the provisions of rules 6 and 7, a Clerk Typist may avail any number of chances for appearing the Examination.

9. *Examination when to be held and language of papers.*—The Commissioner of a division shall conduct the Examination and ordinarily it shall be held twice in a year, on such dates and places, as may be decided by him. The candidates shall answer the papers in Marathi language only.

10. *Consequences when examination not held.*—If for any reason, the Examination is not held in a particular half year, that period shall be excluded while computing the chances mentioned in rule 6.

11. *Syllabus.*—The syllabus for the Examination and maximum number of marks allotted for each paper shall be as mentioned in Appendix 'A'.

12. *Standard of passing.*—The standard of passing the Examination shall be 50 per cent of the total marks, in each subject.

13. *Exemption in subject.*—A Clerk Typist who fails to pass the Examination but secured 55 per cent or more marks in any subject, shall be exempted from passing for that subject at any subsequent Examination. The candidate who has secured exemption in any subject, has to specifically claim it at the time of appearing at any subsequent Examination by applying for it and if the exemption is not so claimed, it will be presumed that the candidate has not availed of such exemption.

14. *Credit.*—(1) A Clerk Typist who passes the Examination in firs attempt and secures 70 per cent or more marks in any paper, an entr regarding his performance in that paper shall be recorded in his Confidetia Record;

(2) A Clerk Typist who passes the examination in all papers at onc and the same time and secures 70 per cent or more of the aggregate mar shall be considered to have passed the examination with credit and a entry regarding his performance shall be recorded in his confidential record ;

Provided that, a Clerk Typist who has secured an exemption in an subject, in accordance with the provisions of rule 13, and passed th Examination at any subsequent attempt in the remaining subjects sha not be considered to have passed the Examination with credit.

15. *Determination of Seniority.*—Subject to the provision of rule the seniority of a candidate may be fixed on the basis of the date passing of the Examination for the purpose of qualifying for promotio to the post in the cadre of Awal Karkun. As among the candidates wh pass the Examination, the date of continuous service in the lower po shall determine the seniority and in case it is the same, the candida older in age shall be declared as senior.

16. *Application Form for appearing in the Examination.*—Eve Clerk Typist who desires to appear for the Examination shall apply, writing in the Form prescribed in Appendix 'B' to the concerned Collecto

939
-19-

# APPENDIX 'A'

*Syllabus for Revenue Qualifying Examination*

| Sr. No. (1) | Paper No. (2) | Subject (3) | Marks (4) | Time (5) |
|---|---|---|---|---|
| 1 | Paper No. 1 (with books) | Judicial Questions on ... (*a*) Indian Evidence Act, 1872 (*b*) The Criminal Procedure Code, 1973 [Chapter 1 to 8, 10 to 14, 19, 20, 23 (Part-A) 27, 32, 33, 34.] (*c*) High Court Criminal Manual, 1960 (Chapter I to III, V, XVIII, XX, XXIV, XXV, XXVI, XXVII). | 100 | 3 Hours |
| 2 | Paper No. II | Judicial Questions on (*a*) Bombay Village Panchayats Act, 1958 (without book). (*b*) The Maharashtra Village Police Act, 1967 (without book). (*c*) The Bombay Police Act, 1951 (without book). | 100 | 3 Hours |
| 3 | Paper No. III (without books) | Revenue Questions on ... (*a*) Maharashtra Land Revenue Code Rules thereunder/Maharashtra Land Revenue Manual Vol. I. (*b*) Indian Forests Act, 1927. | 100 | 3 Hours |
| 4 | Paper No. IV (with books) | Revenue Questions on ... (*a*) Maharashtra Municipalities Act, 1965 and Rules thereunder. (*b*) Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samiti Act, 1961 and Rules thereunder. (*c*) Bombay Prohibition Act and Rules thereunder, 1949. (*d*) Land Acquisition Act and Rules thereunder, 1894. (*e*) Irrigation Act, 1976 and Rules thereunder. (*f*) Bombay Wild Animals and Wild Birds Protections Act, 1951 and Rules thereunder. | 100 | 3 Hours |
| 5 | Paper No. V (with books) | Maharashtra Land Revenue Manual Volumes II, III, IV and V. | 75 | $2\frac{1}{2}$ Hours |

| Sr. No. (1) | Paper No. (2) | Subject (3) | Marks (4) | Time (5) |
|---|---|---|---|---|
| 6 | Paper No. VI (with books) | (*i*) Bombay Financial Rules, 1959 (F.P. No. 1) Chapter 1 to 6, 11 and 12.<br>(*ii*) Maharashtra Contingency Expenditure Rules, 1965 (F.P. No. 9), Part I, Section I to VI and Part II, Section 1 to 11.<br>(*iii*) Maharashtra Budget Manual, 2nd Edition (F.P. No. X) (Chapter 1, 2, 3, 4 to 7, 9) (except paragraphs 112 to 117) X to XII and Appendix 8).<br>(*iv*) Maharashtra Civil Service (General (conditions of Services) Rules, 1981.<br>(*v*) Maharashtra Civil Service (Pay) Rules, 1981.<br>(*vi*) Maharashtra Civil Service (Joining Time, Foreign, Service and Payment during Suspension, Dismissal and Removal from Service) Rules, 1981.<br>(*vii*) Bombay Civil Services Rules Manual (F. P. No. 5) Chapter XII, Part III to VIII relating to T. A. only XV and XVII of Volume I. | 100 | 3 Hours |
| 7 | Paper No. VII (with books) | Revenue Questions on ...<br>(*a*) Bombay Tenancy and Agricultural Land Act, 1948 and Rules thereunder.<br>(*b*) Manual of Office Procedure of Collectorate.<br>(*c*) Portion from Survey and Settlement Manual Vol. I and Vol. II.<br>Volume I—<br>Chapters—<br>(I) Introductory.<br>(II) The Indian System of Land Revenue Administration.<br>(VII) The Original Settlement.<br>(VIII) The Revision Settlement.<br>(IX) The Rights and Obligations of the Occupation.<br>Volume II—<br>(I) Introductory.<br>(VIII) Settlement Procedure.<br>(IX) The Calculation of Assessment.<br>(X) Survey and Settlement Record. | 75 | $2^1/_2$ Hours |

## APPENDIX ' B'

*Application form for admission to the Revenue Qualifying Examination for the cadre of Clerks Typist*

(1) Applicant's full name :
(Beginning with Surname)

(2) Revenue Division & District :

(3) Date of appointment as Clerk Typist :

(4) Year in which he desires to appear for the Revenue Qualifying Examination.

(5) Attempt number.

(6) If an applicant has been exempted from any paper/papers.—

(a) Year of Examination (in which he had appeared)

(b) Seat Number

(c) Name/Names of the question paper/ papers in which he has been exempted.

(d) Percentage of the marks obtained.

(7) Date of passing the sub-service Departmental Examination.

Date : Signature of Applicant.

*(FOR OFFICE USE ONLY)*

The information filed by the applicant mentioned in column 3, 5, 6 a
is found correct.

No. ........................................ .............. Head of Office/Collector

Office of the........................................ District ..........................

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NAND LAL,
Principal Secretary (Revenue).

-१३४-
-२३-

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ जुलै १९९९.

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक परीक्षा. १२८५/२७७५/प्र. क्र. ३३९/(भाग २)/ई-७.––भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून या बाबतीत करण्यात आलेल्या व राज्यात किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अस्तित्वात असलेल्या नियमांचे आदेशांचे किंवा लेखांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील लिपिक-टंकलेखकांच्या संवर्गामधून अव्वल कारकून पदावर पदोन्नतीसाठी पुढील महसूल अर्हता परीक्षा नियम करीत आहेत, ते असे:––

१. **संक्षिप्त नाव**.––या नियमास लिपिक-टंकलेखकांच्या संवर्गामधून अव्वल कारकून पदावरील पदोन्नतीसाठीचे महाराष्ट्र महसूल अर्हता परीक्षा नियम, १९९९ असे म्हणावे.

२. **व्याख्या**.––या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर––

(अ) " परिशिष्ट " म्हणजे या नियमांचे परिशिष्ट ;

(ब) " नियत दिनांक " म्हणजे हे नियम अंमलात आल्याचा दिनांक ;

(क) " अव्वल कारकून " म्हणजे अव्वल कारकून व त्यामध्ये महाराष्ट्र महसूल विभाग अव्वल कारकून (सेवाप्रवेश) नियम, १९९६ अन्वये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कोषागार, अव्वल कारकून, उप चिटणीस व शिरस्तेदार या सर्व पदांचा समावेश होतो ;

(ड) " लिपिक-टंकलेखक " यामध्ये कोणत्याही विभागातील महसूल कार्यालयातील कनिष्ठ लिपिक, निवडणूक निरीक्षक आणि कनिष्ठ लेखा परीक्षक इत्यादींचा समावेश होतो ;

(ई) " विभागीय परीक्षा " म्हणजे विभागीय दुय्यम सेवा परीक्षा किंवा महसूल लिपिक विभागीय परीक्षा आणि यात शासनाने लिपिकांना किंवा लिपिकांच्या संवर्गात समाविष्ट केलेल्या पदांना स्थायी होण्यासाठी आवश्यक केलेल्या दुसऱ्या कोणत्याही परीक्षेचा अंतर्भाव होतो ;

(फ) " विभाग " म्हणजेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम, एकेचाळीस) च्या कलम ३ अन्वये रचना करण्यात आलेला महसूल विभाग ;

(ग) " परीक्षा " म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या अधिपत्यार लिपिक-टंकलेखक संवर्गामधून अव्वल कारकून पदावर पदोन्नती देण्यासाठी असलेली म अर्हता परीक्षा ;

(ह) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक आणि माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम, एकेचा अन्वये अधिनियमात व्याख्या केल्यानुसार विभागीय मंडळाकडून माध्यमिक शिक्षणाच्या अखं टप्प्यावर घेतली जाणारी अंतिम परीक्षा व यात राज्य शासनाने त्याच्याशी समतूल्य अस जाहीर केलेल्या अन्य कोणत्याही परीक्षेचा समावेश होतो.

३. **परीक्षा उत्तीर्ण होण्याची आवश्यकता**.--प्रत्येक लिपिक-टंकलेखकाला त्याची नि पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाद्वारे नियत दिनांकापूर्वी किंवा नंतर झालेली असली तरीही, ि ५ अन्वये त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर अव्वल कारकून या प पदोन्नती मिळण्यास पात्र होण्यासाठी या नियमांच्या तरतुदींनुसार त्याला परीक्षा उत्तीर्ण आवश्यक राहील.

४. **परीक्षेला बसण्यासाठी पात्रता**.---प्रत्येक लिपिक-टंकलेखक---

(अ) ज्याने त्याच्या पदावर किमान तीन वर्षांची सतत सेवा पूर्ण केलेली आहे, आणि

(ब) ज्याने यथास्थिती, विभागीय दुय्यम सेवा परीक्षा किंवा महसूल लिपिक विभा परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे.

तो या परीक्षेला बसण्यास पात्र असेल.

५. **परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट**.---खालील व्यक्ती परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून मिळण्यास पात्र होतील :---

(अ) जी व्यक्ती नियत तारखेपूर्वी खुद्द अव्वल कारकून या पदावर किंवा अव्वल कार या संवर्गात समाविष्ट असलेल्या इतर पदांवर, आधीच स्थायी झालेली आहे ;

(ब) ज्या व्यक्तीने नियत दिनांकापूर्वीच महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण केली आहे ;

(क) जी व्यक्ती दिनांक १ नोव्हेंबर १९७७ रोजी वा नंतर ४५ वर्षे वयाची झालेली आ

परंतु असे की, नियम ७ च्या तरतुदींअन्वये जर तिची ज्येष्ठता एकदा डावलली गेली असेल तर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्यामुळे ती परत मिळविता येणार नाही.

६. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी कालावधी व संधीची संख्या.**––प्रत्येक लिपिक-टंकलेखकाने तीन संधींमध्ये आणि त्याच्या सतत सेवेच्या नऊ वर्षांत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

७. **परीक्षा उत्तीर्ण होण्याचे ज्येष्ठतेवर होणारे परिणाम.**––नियम ६ मधील तरतुदींनुसार ज्या लिपिक-टंकलेखकाने परीक्षा उत्तीर्ण केली आहे त्याची मूळ ज्येष्ठता अबाधित राहील. तीन संधींत व नऊ वर्षांत तो परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास जे लिपिक-टंकलेखक त्याच्या अगोदर परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत किंवा ज्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली आहे तसेच ज्येष्ठता सूचीत जे लिपिक-टंकलेखक त्याला वरिष्ठ असतील व जे त्याच्यानंतर परंतु या नियमांमध्ये विहित केलेल्या कालावधीत आणि विहित संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण होतील अशा सर्व लिपिक-टंकलेखकांच्या खाली त्यांचा ज्येष्ठताक्रम लागेल.

८. **परीक्षेला बसण्यासाठी संधी.**––नियम ६ आणि ७ च्या तरतुदींच्या अधीन राहून लिपिक-टंकलेखकास परीक्षेला बसण्यासाठी कितीही संधींचा लाभ घेता येईल.

९. **परीक्षा घेण्याची वेळ आणि प्रश्नपत्रिकेचे माध्यम.**––संबंधित विभागीय आयुक्त परीक्षेचे आयोजन करतील व सर्वसाधारणपणे विभागीय आयुक्त ठरवतील त्या तारखांना व त्या ठिकाणी ती वर्षातून दोनदा घेतली जाईल. उमेदवाराला प्रश्नांची उत्तरे मराठीतूनच लिहावी लागतील.

१०. **परीक्षा घेण्यात न आल्यास त्याचे परिणाम.**––एखाद्या विशिष्ट अर्धवर्षामध्ये कोणत्याही कारणास्तव परीक्षा घेण्यात आली नाही तर नियम ६ मध्ये नमूद केलेल्या संधींची गणना करताना तो विशिष्ट अवधी वगळण्यात येईल.

११. **पाठ्यक्रम.**––परीक्षेचा पाठ्यक्रम आणि प्रत्येक प्रश्नपत्रिकेकरिता ठेवण्यात आलेले अधिकतम गुण परिशिष्ट ' अ ' मध्ये नमूद केल्यानुसार असतील.

१२. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मानक.**––प्रत्येक प्रश्नपत्रिकेच्या एकूण गुणांच्या ५० टक्के गुण हे परीक्षा उत्तीर्ण होण्याचे मानक असेल.

१३. **परीक्षेतील एखाद्या विषयामध्ये सूट.**––एखादा लिपिक-टंकलेखक जो परीक्ष अनुत्तीर्ण झाला असेल परंतु त्याला कोणत्याही विषयामध्ये ५५ टक्के किंवा जास्त गुण मि असतील तर त्याला त्या विषयाला पुढील परीक्षेमध्ये पुन्हा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात ये ज्या उमेदवाराला कोणत्याही विषयामध्ये सूट मिळालेली असेल त्या उमेदवाराने पुढील परीक्ष वेळी त्या सुटीसाठी लेखी अर्ज केला पाहिजे. जर त्याने सूट मिळण्यासाठी मागणी केलेली न तर असे समजण्यात येईल की, त्या उमेदवाराने सुटीचा फायदा घेतलेला नाही.

१४. **विशेष गुणवत्ता.**––(१) जो लिपिक-टंकलेखक पहिल्या प्रयत्नामध्ये परीक्षा उ होईल आणि कोणत्याही प्रश्नपत्रिकेमध्ये ७० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवील त्य त्या प्रश्नपत्रिकेमधील विशेष गुणवत्तेची नोंद त्याच्या गोपनीय अहवालात घेण्यात येईल.

(२) जो लिपिक-टंकलेखक सर्व प्रश्नपत्रिकांमध्ये एकाच प्रयत्नामध्ये एकूण ७० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवून उत्तीर्ण होईल त्याने ती परीक्षा विशेष गुणवत्तेने उत्तीर्ण केल समजण्यात येईल आणि त्याच्या त्या गुणवत्तेची नोंद त्याच्या गोपनीय अहवालात घेण्यात ये

तथापि, ज्या लिपिक-टंकलेखकास नियम १३ च्या तरतुदींनुसार कोणत्याही विषयातून मिळाली असेल व तो कोणत्याही नंतरच्या प्रयत्नात उर्वरित विषयात उत्तीर्ण झाला असेल त ती परीक्षा विशेष गुणवत्तेने उत्तीर्ण झाल्याचे समजण्यात येणार नाही.

१५. **ज्येष्ठता ठरविण्याची पद्धत.**––नियम ७ च्या तरतुदींच्या अधीन राहून, उमेदवा ज्येष्ठता त्याने परीक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकाच्या आधारे अव्वल कारकून संवर्गातील पदाव पदोन्नतीसाठीच्या पात्रतेसाठी निश्चित करण्यात येईल. ज्या उमेदवारांनी एकाच वेळी प उत्तीर्ण केली असेल त्यांच्या सतत सेवेची निम्न पदावरील ज्येष्ठता विचारात घेऊन त्यांची ज्ये ठरविण्यात येईल आणि जर ती एकच असेल तर वयाने अधिक असलेला उमेदवार ज समजण्यात येईल.

१६. **परीक्षेला बसण्याकरिता अर्जाचा नमुना.**––परीक्षेला बसण्यास इच्छुक असण प्रत्येक लिपिक-टंकलेखकाने परिशिष्ट 'ब' मध्ये विहित केलेल्या नमुन्यात संबंधित जिल्हाधिकाऱ्यां लेखी अर्ज करावा.

-27-
-935

परिशिष्ट 'अ'
(कृपया नियम ११ पहा)

# महसूल अर्हता परीक्षेचा पाठ्यक्रम

| अनु-क्रमांक (१) | प्रश्नपत्रिका क्रमांक (२) | पुढील बाबींवरील न्यायिक प्रश्न (३) | गुण (४) | वेळ (५) |
|---|---|---|---|---|
| १ | प्रश्नपत्रिका क्र. १ (पुस्तकांसहित) | (अ) भारतीय पुरावा अधिनियम, १८७२.<br>(ब) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ [प्रकरण १ ते ८, १० ते १४, १९, २०, २३, (भाग अ), २७, ३२, ३३, ३४].<br>(क) उच्च न्यायालय फौजदारी, नियम पुस्तिका, १९६०, (भाग एक ते तीन, पाच, अठरा, वीस, चोवीस, पंचवीस, सव्वीस, सत्तावीस). | १०० | ३ तास |
| २ | प्रश्नपत्रिका क्र. २ | पुढील बाबींवरील न्यायिक प्रश्न<br>(अ) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (पुस्तकाशिवाय).<br>(ब) महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम, १९६७ (पुस्तकाशिवाय).<br>(क) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (पुस्तकाशिवाय). | १०० | ३ तास |
| ३ | प्रश्नपत्रिका क्र. ३ (पुस्तकाशिवाय). | पुढील बाबींवरील महसूलविषयक प्रश्न<br>(१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता व त्याखालील नियम/महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका खंड-१.<br>(२) भारतीय वन अधिनियम, १९२७. | १०० | ३ तास |
| ४ | प्रश्नपत्रिका क्र. ४ (पुस्तकासहित). | पुढील बाबींवरील महसूलविषयक प्रश्न<br>(अ) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ व त्याखालील नियम.<br>(ब) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ व त्याखालील नियम.<br>(क) मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ व त्याखालील नियम. | १०० | ३ तास |

| अनु-क्रमांक (१) | प्रश्नपत्रिका क्रमांक (२) | पुढील बाबींवरील न्यायिक प्रश्न (३) | गुण (४) | वे(५) |
|---|---|---|---|---|
| | | (ड) भूसंपादन अधिनियम, १८९४ व त्याखालील नियम.<br>(इ) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ व त्याखालील नियम.<br>(फ) मुंबई वन्य पशू व वन्य पक्षी संरक्षण अधिनियम, १९५१ व त्याखालील नियम.. | | |
| ५ | प्रश्नपत्रिका क्र. ५ (पुस्तकांसहित). | महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका, खंड २, ३, ४ व ५. | ७५ | २½ |
| ६. | प्रश्नपत्रिका क्र. ६ (पुस्तकांसहित). | (१) मुंबई वित्तीय नियम, १९५९ (वित्तीय प्रकाशन क्र. १) भाग १ ते ६, ११, १२.<br>(२) महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ (वित्तीय प्रकाशन क्र. ९) भाग १ (कलम १ ते ६), भाग २ (कलम १ ते ११).<br>(३) महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका, दुसरी आवृत्ती (वित्तीय प्रकाशन क्र. १०) प्रकरण १, २, ३, ४ ते ७, ९) (११२ ते ११७ परिच्छेद वगळून) (१० ते १२ व परिशिष्ट ८).<br>(४) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१.<br>(५) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१.<br>(६) महाराष्ट्र नागरी सेवा पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा, बडतर्फ सेवेतून काढून टाकणे व निलंबन काळातील भत्ते) नियम, १९८१.<br>(७) मुंबई नागरी सेवा नियम पुस्तिका, वित्तीय प्रकाशन क्र. (५), प्रकरण १२, भाग ३ ते ८. प्रवास भत्त्याशी संबंधित फक्त खंड १ मधील १५ व १७. | १०० | ३ ता |
| ७ | प्रश्नपत्रिका क्र. ७ (पुस्तकांसहित). | पुढील बाबींवरील महसूलविषयक प्रश्न.—<br>(अ) मुंबई शेतजमीन व कूळकायदा अधिनियम, १९४८ व त्याखालील नियम. | ७५ | २½ |

| अनु-क्रमांक (१) | प्रश्नपत्रिका क्रमांक (२) | पुढील बाबींवरील न्यायिक प्रश्न (३) | गुण (४) | वेळ (५) |
|---|---|---|---|---|
| | | (ब) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्य-पद्धतीची नियम पुस्तिका.<br>(क) सर्वेक्षण व जमाबंदी नियम पुस्तिका, खंड १ व खंड २ मधील पुढील भाग.<br>खंड १<br>प्रकरण<br>(१) प्रास्ताविक.<br>(२) जमीन महसूल प्रशासनाची भारतीय पद्धती.<br>(७) मूळ जमाबंदी.<br>(८) पुनरीक्षण जमाबंदी.<br>(९) भोगवट्याचा अधिकार व दायित्वे.<br>खंड २<br>(१) प्रास्ताविक.<br>(८) जमाबंदी कार्यपद्धती<br>(९) आकारणीची गणना.<br>(१०) सर्वेक्षण व जमाबंदी अभिलेख. | | |

## परिशिष्ट ' ब '

(नियम १६ पहा)

## लिपिक-टंकलेखक या संवर्गाला महसूल अर्हता परीक्षेला प्रवेश मिळवण्याकरिता अर्जाचा नमुना

(१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :
(आडनावापासून सुरू करून)

(२) महसूल विभाग व उप विभाग :

(३) लिपिक-टंकलेखक म्हणून नियुक्तीचा दिनांक :

(४) ज्या वर्षी अर्जदार महसूल अर्हता परीक्षेला बसू इच्छितो ते वर्ष.

(५) कितवा प्रयत्न :

(६) जर अर्जदाराला कोणत्याही प्रश्नपत्रिकेमधून सूट मिळालेली असेल तर,—

(अ) ज्या परिक्षेला बसलेला होता त्या परीक्षेचे वर्ष

(ब) आसन क्रमांक :

(क) सूट मिळालेल्या पश्नपत्रिकेचे नाव/प्रश्नपत्रिकांची नावे.

(ड) मिळालेल्या गुणांची टक्केवारी :

983
-3/-

(७) अर्जदार विभागीय दुय्यम सेवा परीक्षा उत्तीर्ण
झाल्याचा दिनांक.

दिनांक : अर्जदाराची सही.

---

## (फक्त कार्यालयीन वापराकरिता)

अर्जदाराने स्तंभ क्रमांक ३, ५, ६ व ७ मध्ये नमूद केलेली माहिती अचूक असल्याचे आढळून आले आहे.

क्रमांक :

........................................ कार्यालय.

दिनांक : कार्यालय प्रमुख/उप विभागीय अधिकारी.

........................ जिल्हा

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नंद लाल,**
प्रधान सचिव (महसूल).